# Yashoda Girls' Arts & Commerce College, Nagpur

## Department of Political Science

## Assignment

## Session: 2019 – 2020

Page :
Date : / /

2019-2020

नाव :- भाग्यश्री भगवानजी कोंबाडे.
कॉलेज :- यशोदा गर्ल्स आर्ट्स ॲण्ड कामर्स कॉलेज.

वर्ग :- B.A. IInd year.
IVth semester.

विषय :- राज्यशास्त्र

SEAL

2019-2020

मार्गदर्शक.
सांबारे सर.

Principal
[illegible] Girls Arts & Commerce
[illegible]

विद्यार्थी स्वाक्षरी.
Kombade.

Page :
Date : / /

SEAL

(1) राज्यपालाचे शासनविषयक अधिकार सांगा?

उत्तर- भारतात संघराज्य पद्धती स्वीकारल्यात आल्यामुळे केंद्रसरकारप्रमाणेच प्रत्येक घटक राज्यांची कोणकोणती शासन व्यवस्था आहे तसेच घटक राज्यात केंद्राप्रमाणेच संसदीय शासन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे संघराज्याचा जसा राष्ट्रपती घटनात्मक प्रमुख असतो तसाच घटक राज्याचा राज्यपाल हा घटनात्मक प्रमुख असतो घटकराज्याच्या कार्यकारी मंडळाचा प्रमुख राज्यपाल असतो घटकराज्याचा राज्यकारभार राज्यपालाच्या नावाने चालतो राज्यपालाला शासनकारभारात मदत करण्यासाठी व सल्ला देण्यासाठी मुख्यमंत्र्याच्या नेतृत्वाखाली एक मंत्रिपरिषद असते राज्याचे सर्व आदेश राज्यपालाच्या नावाने निघतात. व प्रसारित होतात राज्यपालाला काही बाबतीत स्वविवेकाधिनुसार कार्य करण्याचा अधिकार आहे तो राज्यात केंद्र सरकारचा प्रतिनिधी म्हणून कार्य करीत असतो यामुळे राज्यात त्याचे पद महत्त्वाचे मानले जाते

SEAL

## नियुक्ती :

राज्यपालाची नियुक्ती भारताचा राष्ट्रपती करतो. केंद्रीय मंत्रीमंडळाच्या सल्ल्याने ही नियुक्ती केली जाते. साधारणतः घटकराज्यात राज्यपालाची नियुक्ती करतेवेळी त्या राज्याच्या मुख्यमंत्र्यासोबत चर्चा व विचारविनिमय करावा. असा एक संकेत आहे. तसेच त्या घटक राज्याचा नागरिक नसावा. असाही एक संकेत आहे. एकाचवेळेस एका व्यक्तीची एक किंवा दोन घटकराज्याच्या राज्यपाल म्हणून नियुक्ती केली जाऊ शकते.

## पात्रता :

राज्यपाल पदासाठी पुढील पात्रता आवश्यक आहे.

① तो भारताचा नागरिक असावा.
② त्याच्या वयाची ३५ वर्षे पूर्ण झालेली असावी.

③ संसद किंवा राज्यविधिमंडळाचा सदस्य नसावा.

नियुक्ती :

राज्यपालाची नियुक्ती भारताचा राष्ट्रपती करतो. केंद्रीय मंत्रीमंडळाच्या सल्याने ही नियुक्ती केली जाते. साधारणतः घटकराज्यात राज्यपालाची नियुक्ती करतेवेळी त्या राज्याच्या मुख्यमंत्र्यासोबत चर्चा व विचारविनिमय करावा. असा एक संकेत आहे. तसेच तो घटक राज्याचा नागरिक नसावा. असाही एक संकेत आहे. एकाविळेस एका व्यक्तीची एक किंवा दोन घटकराज्याचा राज्यपाल म्हणून नियुक्ती केली जाऊ शकते.

पात्रता :

राज्यपाल पदासाठी पुढील पात्रता आवश्यक आहे.

① तो भारताचा नागरिक असावा.
② त्याच्या वयाची ३५ वर्षे पुर्ण झालेली असावी.

③ संसद किंवा राज्यविधिमंडळाची सदस्य नसावा.

(4) कोणतेही लाभाचे पद धारण करणारा नसावा.

राज्यपालाचे शासनविषयक अधिकार :-

(1) शासनविषयक अधिकार :-

राज्यघटनेच्या १५४ व्या कलमानुसार राज्याची संपूर्ण कार्यकारी सत्ता राज्यपालाकडे राहील. आणी त्या सत्तेचा वापर तो स्वत: किंवा आपल्या दुय्यम अधिकाऱ्यांमार्फत करेल. अशी तरतूद आहे त्यानुसार त्याला पुढील शासनविषयक अधिकार प्राप्त होतात.

(अ) मंत्रीमंडळाची नियुक्ती :-

राज्यपाल हा घटक राज्याच्या कार्यकारी मंडळाचा प्रमुख असून त्याच्या नावाने त्याच्या घटकराज्याचा राज्यकारभार चालतो. घटनेच्या १६३ कलमानुसार त म्हटले आहे की, राज्यपालाला त्याच्या कार्यात मदत करण्यासाठी व त्याला सल्ला देण्यासाठी मुख्यमंत्र्याच्या नेतृत्वाखाली एक मंत्रिमंडळ राहील. त्यानुसार मुख्यमंत्री व त्याच्या सल्ल्याने इतर मंत्र्यांची नियुक्ती राज्यपाल करीत

असतात. असतो घटनेनुसार सर्व मंत्री राज्यपालाला जबाबदार असतात. मंत्र्यामध्ये खातेवाटप करण्याचा अधिकार सुद्धा घटनेनुसार राज्यपालाला दिलेला आहे. राज्यपाल मुख्यमंत्र्याकडून कोणतीही माहिती मागवू शकतो.

(ब) पदाधिकाऱ्याची नियुक्ती :-

राज्य लोकसेवा आयोगाचा अध्यक्ष व सदस्य राज्याचा महाधिवक्ता, राज्य निवडणूक आयुक्त, राज्याचा लेखा परीक्षक, जिल्हा व सत्र न्यायाधीश इत्यादींची नियुक्ती राज्यपाल करीत असतो. मंत्रीमंडळाच्या बैठकीत घेतलेले निर्णय राज्यपालाला कळविणे ही मुख्यमंत्र्याची जबाबदारी असते. केंद्र सरकारच्या आदेशाची व योजनांची राज्यात अंमलबजावणी होते की नाही. हे पाहण्याचे काम राज्यपालाचे आहे.

② विधीविषयक अधिकार :-

राज्यघटनेच्या १६८ व्या कलमानुसार राज्यपाल राज्यविधीमंडळाचे अभिन्न अंग आहे. त्यामुळे विधिविषयक क्षेत्रात राज्यपालाला पुढील अधिकार प्राप्त झालेले आहेत.

(अ) अधिवेशन बोलाविणे :-

राज्यविधिमंडळाचे अधिवेशन बोलाविणे, अधिवेशन समाप्त करणे, विधानसभा विसर्जित करणे, विधानपरिषद अस्तित्वात असल्यास त्यातील काही सभासदांची नियुक्ती करणे, अँग्लो इंडियन्स लोकांना पुरेसे प्रतिनिधित्व मिळाले नसल्यास त्यांचा एक प्रतिनिधी विधानसभेत नियुक्त करणे इत्यादी अधिकार राज्यपालाला प्राप्त झालेले आहेत.

(ब) अभिभाषण देणे :-

निवडणुकी नंतर होणाऱ्या राज्यविधिमंडळाच्या पहिल्या अधिवेशनाची सुरुवात व दरवर्षी भरणाऱ्या व पहिल्या अधिवेशनाची राज्यपालाच्या अभिभाषणाने होते. राज्यपाल विधीमंडळाकडे

प्रस्ताव संदेश पाठवू शकतो. त्या संदेशाचा विचार सभागृहाला करावा लागतो. तो दोन्ही सभागृहांचे संयुक्त अधिवेशन बोलावू शकतो व त्या अधिवेशात व त्या अधिवेशनात भाषण देऊ शकतो.

(५) अध्यादेश काढणे :-

प्रस्ताव कायद्याची अत्यंत आवश्यकता असेल. परंतु संसदविधिमंडळाचे अधिवेशन सुरू असेल. अशावेळी अध्यादेश किंवा वटहुकूम काढण्याचा अधिकार राज्यपालाला आहे. अध्यादेशाचा दर्जा कायद्याबरोबरचा असतो. विधिमंडळाचे अधिवेशन सुरू झाल्यानंतर त्या अध्यादेशाला विधिमंडळाची मंजुरी मिळाल्यास त्याचे कायद्यात रूपांतर होते. अन्यथा रद्द होते.

(६) विधेयकावर स्वाक्षरी करणे :-

राज्यविधिमंडळाने विधेयक मंजूर केल्यानंतर त्यावर राज्यपालाची सही झाल्याशिवाय त्या विधेयकाचे कायद्यात रूपांतर

होत नाही. राज्यपाल एखाद्या विधेयकाला संमती नाकारू शकतो. किंवा त्यात दुरुस्त्या सुचवू शकतो. परंतु विधिमंडळाकडून ते विधेयक पुन्हा मंजूर आल्यास राज्यपालाला त्यावर सही करावीच लागते.

(३) विधेयकाला राष्ट्रपतीची परवानगी :-

काही विधेयके राज्यपाल राष्ट्रपतीच्या संमतीसाठी पाठवीत असतो. राष्ट्रपतीने अशा विधेयकाला संमती नाकारल्यास ती रद्द होतात. विशिष्ट विधेयके विधिमंडळात सादर करण्यापूर्वी राष्ट्रपतीची परवानगी घेतली किंवा नाही हे पाहणे राज्यपालाचे काम आहे.

(2) विधानपरिषदेची कार्ये व अधिकार लिहा?

उत्तर: भारतात केंद्राप्रमाणेच सर्व घटकराज्यात सुद्धा संसदीय शासन पद्धती स्वीकारण्यात आली आहे त्यामुळे सर्व घटक राज्यांची स्वतंत्र विधिमंडळे आहेत घटक राज्यांसाठी कायद्यांची निर्मिती करणे हे त्या राज्याच्या विधिमंडळाचे कार्य असते. भारतीय राज्यघटनेच्या १६८ व्या कलमानुसार प्रत्येक घटकराज्यात एक विधिमंडळ राहील. आणी ते राज्यपाल; विधानसभा व असल्यास विधानपरिषद मिळून बनेल असे म्हटले आहे. परंतु भारताच्या सर्वच घटक राज्यांचे विधिमंडळ द्विगृही नाहीत, सध्या महाराष्ट्र, कर्नाटक, बिहार, उत्तरप्रदेश, जम्मु काश्मीर, आंध्रप्रदेश व तेलंगणा या घटकराज्यांमध्ये द्विगृही विधिमंडळे आहेत. उरलेल्या सर्व घटक राज्यांची विधिमंडळे एकगृहीच आहेत.

घटक राज्यांमध्ये द्विगृही विधिमंडळ असल्यास कनिष्ठ सभागृहाला विधानसभा व वरिष्ठ सभागृह

विधानपरिषद म्हटले जाते विधानसभा नावाने कनिष्ठ सभागृह असले. तरी अधिकाराच्या दृष्टीने ते विधानपरिषदेपेक्षा श्रेष्ठ असते विधानसभा हे लोकनिर्वाचीत सभागृह असते राज्यातील मतदारांनी प्रत्यक्ष मतदानाने निवडून दिलेले प्रतिनिधी येथ असतात.
विधानपरिषदेची रचना मात्र विशिष्ट पद्धतीने केली जाते. ज्या राज्याने विधिमंडळ पद्धती असते तेथे फक्त विधानसभाच अस्तित्वात असते व संपूर्ण कायदेविषयक सूत्रांचा वापर विधानसभेकडून केला जातो.
राज्यघटनेच्या कलम १६९ मधे म्हटले आहे की, जर विधानसभेतील उपस्थित आणि मतदान करणाऱ्या सदस्यांच्या 2/3 बहुमताने राज्यात अस्तित्वात असलेली विधानपरिषद समाप्त करण्याचा किंवा अस्तित्वात नसेल, तर ती निर्माण करण्याचा प्रस्ताव मंजूर केला असेल, तर संसद त्या राज्यासाठी विधानपरिषद समाप्त किंवा निर्माण करण्यासाठी कायदा बनवू शकते परंतु अशाप्रकारे बनविण्यात आलेला कायदा घटना दुरुस्ती मानण्यात येणार नाही.

## सभापतीचे अधिकार व कार्य :-

विधानसभेच्या सभापतीच्या अधिकार व कार्याचे विवेचन पुढील प्रमाणे करता येते.

1. विधानपरिषदेच्या बैठकीचे अध्यक्षस्थान भूषविणे.
2. सभागृहाचे नियमानुसार कामकाज चालविणे.
3. सभागृहात शांतता व सुव्यवस्था टिकवून ठेवणे.
4. सर्व सदस्यांना बोलण्याची संधी देणे.
5. सभासदांना ठराव किंवा विधेयक मांडण्याची परवानगी देणे.
6. विभिन्न प्रस्ताव, ठराव विधेयकावर चर्चा घडवून आणणे.
7. विभिन्न कामासाठी वेळ निश्चित करणे.
8. एखाद्या ठरावावर किंवा विधेयकावर मतदान घेऊन निर्णय जाहीर करणे.

(९) एखाद्या विधेयकावर समान मते पडल्यास स्वतःचे निर्णायक मत देणे.

(१०) गणसंख्या पूर्ण होत नसेल तर बैठक स्थगित करणे.

(११) एखादा सदस्य सभागृहात गोंधळ घालीत असेल तर त्याला बाहेर काढणे, किंवा त्याचे सदस्यत्व काही काळासाठी रद्द करणे. इत्यादी.

अशाप्रकारे विधानपरिषदेच्या सभापतीला व्यापक अधिकार प्राप्त झालेले आहेत. म्हणूनच त्याचे पद मानाचे व प्रतिष्ठेचे मानले जाते. सभागृहात प्रत्येक सभासद सभापतीला संबोधून भाषण करतो. सभापती आपल्या आसनावर बसलेले असतांना सभागृहात येणारा व सभागृहातून बाहेर जाणारा प्रत्येक सभासद सभापतीला अभिवादन करतो. सभापतीच्या परवानगीशिवाय सदस्याला कोणत्याही विषयावर बोलता येत नाही. थोडक्यात सभापती हा विधानपरिषदेच्या मानसन्मानाचे प्रतीक मानला जातो.

विधानपरिषदेचे अधिकार व कार्य :-

विधानपरिषदेचे कामकाज चालविण्यासाठी सभासद आपल्यातून एकाची सभापती व एकाची उपसभापती म्हणून बहुमताने निवड करतात.

विधानपरिषदेचे अधिकार व कार्य :-

① विधिविषयक अधिकार :-

राज्यसूचित सांगितलेल्या सर्व विषयावर कायदा करण्याचा अधिकार विधानपरिषदेला आहे धनविधेयक सोडून कोणत्याही विधेयकाचा जन्म विधानपरिषदेत होऊ शकतो. विधानसभेने पास केलेल्या विधेयकाला विधान परिषदेची संमती आवश्यक असते विधान सभेकडून आलेले विधेयक (धनविधेयक सोडून) विधान परिषदेने तीन महिन्याच्या आत मान्य किंवा अमान्य करून विधानसभेकडे परत पाठविले पाहिजे तसे न केल्यास विधानसभा तेच विधेयक मान्य करून विधान परिषदेकडे पाठविते त्यावेळी एक महिन्यापेक्षा जास्त विलंब विधान परिषद लावू शकत नाही.

## (2) शासनविषयक अधिकार :-

घटक राज्यांचे मंत्रिमंडळ विधानसभेला जबाबदार आहे. तरीही संबंधित मंत्र्याला शासन विषयक प्रश्न विचारून, मंत्रिमंडळाच्या धोरणावर टीका करून, काम तहकुबीची सूचना मांडून मंत्रिमंडळाचे विधेयक अमान्य करून, मंत्रिमंडळावर काही प्रमाणात नियंत्रण ठेवण्याचा अधिकार विधान परिषदेला आहे. विधान परिषद मंत्रिमंडळावर अविश्वास ठराव मांडू शकत नाही.

## (3) अर्थविषयक अधिकार :-

धनविधेयक सर्वप्रथम विधानसभेत मांडण्यात येते. तसा घटनात्मक नियम आहे. विधानसभेने पास केलेले धनविधेयक विधान परिषदेच्या संमतीसाठी येते. असे धनविधेयक प्राप्त झाल्यापासून चौदा दिवसांच्या आत मान्य किंवा अमान्य करून विधान सभेकडे परत पाठवावे लागते. १४ दिवसांच्या आत विधान परिषदेने कोणताच निर्णय कळविला नसेल तर ते विधेयक विधान परिषदेला मंजूर आहे.

असे समजून ते राज्यपालांच्या स्वाक्षरीसाठी पाठविले जाते. अशाप्रकारे धनविधेयकांच्या बाबतीत विधानसभेचा निर्णय अंतिम असतो. इतर अधिकार विधानपरिषदेला आहेत.

(5) मुख्यमंत्र्याची नियुक्तीबाबत माहिती द्या?

उत्तर:

संसदीय शासन पद्धतीत कार्यकारी मंडळाचा वास्तविक शासक म्हणून मुख्यमंत्र्याचे पद स्थान अतिशय महत्वाचे असते. राज्यपाल हा नाममात्र शासनप्रमुख असतो. प्रत्यक्ष तो शासनकारभार मुख्यमंत्री व मंत्रीमंडळाकडून चालविला जातो. मंत्रीमंडळ ही वास्तविक कार्यपालिका असते. या कार्यकारी मंडळाचा नेता मुख्यमंत्री असतो. इतर सर्व मंत्र्यांचे अस्तित्व मुख्यमंत्र्याच्या इच्छेवर अवलंबून असते. इतर सर्व मंत्र्यांचे अस्तित्व मुख्यमंत्र्याच्या इच्छेवर अवलंबून असते. मुख्यमंत्र्याच्या विचारांचा मतांचा आणि इच्छेचा प्रभाव मंत्रिमंडळावर पडत असतो.

## नियुक्ती :

राज्यपाल मुख्यमंत्र्यांची व त्यांच्या सल्ल्याने इतर मंत्र्यांची नियुक्ती करेल. अशी घटनेत तरतुद आहे त्यानुसार विधानसभेत ज्या पक्षाला बहुमत मिळते त्या पक्षाच्या नेत्याची मुख्यमंत्री म्हणून निवड राज्यपालाला करावी लागते. मुख्यमंत्र्यांच्या सल्ल्याने इतर मंत्र्यांची नियुक्ती राज्यपाल करेल. अशी घटनात्मक तरतुद असली. तरी मंत्र्यांची नावे,

## कार्यकाल :-

मुख्यमंत्र्यांचा कार्यकाल विधानसभेच्या विश्वासावर अवलंबुन असतो विधानसभेचा विश्वास असल्यास मुख्यमंत्री ५ वर्ष आपल्या पदावर राहु शकतो. कार्यकाल पूर्ण न होण्याआधी तो स्वेच्छेने राजीनामा देऊ शकतो. विधानसभा भंग झाल्यास किंवा मुख्यमंत्र्यावर व मंत्रीमंडळावर अविश्वास ठराव विधानसभेने मंजुर केल्यास त्याला पद सोडावे लागते

| क्र. | नाव | कार्यकाल |
|---|---|---|
| १. | यशवंतराव बळवंत चव्हाण | १९६० ते १९६२ |
| 2. | मारोतराव एस. कन्नमवार | १९६२ ते १९६३ |
| 3. | वसंतराव नाईक. | १९६३ ते १९७५ |
| 4. | शंकरराव भाऊराव चव्हाण. | १९७५ ते १९७७ |
| 5. | वसंत बंडुजी पाटील. | १९७७ ते १९७८ |
| 6. | शरद गोविंद पवार. | १९७८ ते १९८० |
| 7. | अब्दुल रहेमान अंतुले | १९८० ते १९८२ |
| ८. | बाबासाहेब भोसले. | १९८२ ते १९८३ |
| 9. | वसंत भाऊराव बंडुजी पाटील | १९८३ ते १९८५ |
| 10. | शिवाजी पाटील निलंगेकर | १९८५ ते १९८६ |
| 11. | शंकरराव भाऊराव चव्हाण | १९८६ ते १९८८ |
| 12. | शरद गोविंद पाटीलपवार | १९८८ ते १९९१ |

| | | |
|---|---|---|
| 13. | सुधाकरराव नाईक. | १९९१ ते १९९३ |
| 14. | शरद गोविंद पवार | १९९३ ते १९९५ |
| 15. | मनोहर जोशी. | १९९५ ते १९९९ |
| 16. | नारायण राणे. | फेब्रु. १९९९ ते ऑक्टो. १९९९. |

Principal
[illegible] Girls Arts & Commerce
College, [illegible] Nagar, Nagpur-15

2019-2020

SEAL

PRINCIPAL